International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.141 | *Website: https://ijaar.co.in/*
Volume-13, Issue-2 | November - December 2025

Original Article

मराठी चरित्र-आत्मचरित्रपर वाङ्मयेतिहास लेखनदृष्टी

प्रा. डॉ. केदारनाथ काळवणे

सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग,

शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब.

Manuscript ID:
IJAAR-130240

ISSN: 2347-7075
Impact Factor – 8.141

Volume - 13
Issue - 2
November - December 2025
Pp. 284 – 295

Submitted: 10 Nov 2025
Revised: 12 Dec 2025
Accepted: 25 Dec 2025
Published: 31 Dec 2025

Corresponding Author:
प्रा. डॉ. केदारनाथ काळवणे

Quick Response Code:

Website: https://ijaar.co.in/

DOI: 10.5281/zenodo.23936651

DOI Link:
https://doi.org/10.5281/zenodo.23936651

विशिष्ट भाषिक समूहाच्या समग्र साहित्य निर्मिती व साहित्यव्यवहाराचे वाङ्मयीन दृष्टीकोन स्वीकारून केलेले कालिक लेखन म्हणजे स्थूलपणाने वाङ्मयेतिहास लेखन म्हणता येईल. यात त्या-त्या काळातील साहित्यकृती, लेखक-कवी, वाङ्मयीन घटिते आणि त्याला असणार्या सामाजिक-सांस्कृतिक पार्श्वभूमीचे विवेचन अभिप्रेत असते. त्या-त्या कालखंडातील सर्व प्रकारच्या साहित्य आवाजाची तटस्थवृत्तीने मीमांसा वाङ्मयेतिहासात करणे अपेक्षित असते. तरच वाङ्मयेतिहासाला मौलिकता प्राप्त होत असते. साहित्यसमीक्षेने स्वीकारलेली तत्कालीन समीक्षादृष्टीही वाङ्मयेतिहास लेखनावर प्रभाव पाडत असते. पण या समीक्षेचा चिकित्सकपणे उपयोग इतिहासकाराने साधन म्हणून करायचा असतो. तसा केला नाही तर तो इतिहास एकांगी ठरतो. त्याला समग्रता येत नाही. मराठी वाङ्मयेतिहासाबाबतही असेच घडलेले दिसते. याविषयी नागनाथ कोत्तापल्ले म्हणतात, "मराठीत तरी सामग्र्याचे भान असणारे आणि स्वागतशील दृष्टीकोन असणारे वाङ्मयेतिहास निर्माण होताना दिसत नाही. त्यामुळे उपेक्षा आणि पक्षपात यांनी हे वाङ्मयेतिहास समृध्द झालेले आणि हितसंबंधांच्या जंजाळात अडकलेले दिसतात!"१ अशीच काहीशी स्थिती मराठी चरित्र-आत्मचरित्रपर वाङ्मयेतिहासाबाबतही दिसते. या वाङ्मय प्रकाराच्या समग्र अवकाशाला, त्यातील सर्व प्रकारच्या धारांना सामावून घेत, त्याचे समतोल वाङ्मयीन मूल्यमापन करत परिपूर्ण असा मराठी वाङ्मयाचा इतिहास सिध्द झालेला दिसत नाही. ही मराठी चरित्र-आत्मचरित्रपर वाङ्मयेतिहासातील अपूर्णता व त्यात केलेली लेखकांची उपेक्षा आणि स्वीकारलेला पक्षपाती दृष्टीकोन याचे स्थूल विश्लेषण प्रस्तुत निबंधातून केले आहे. त्यासोबतच वाङ्मयेतिहास लेखनातील विश्लेषण विसंगती, भाषा आणि नव्या दृष्टीकोनाचीही चर्चा केली आहे. यातून चरित्र-आत्मचरित्रपर वाङ्मयेतिहास लेखनाचे स्वरूपही विशद झाले आहे ॥१॥

Creative Commons

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)

This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International License (CC BY-NC-SA 4.0), *which permits others to remix, adapt, and build upon the work non-commercially, provided that appropriate credit is given and that any new creations are licensed under identical terms.*

How to cite this article:

प्रा. डॉ. केदारनाथ काळवणे (2025). मराठी चरित्र-आत्मचरित्रपर वाङ्मयेतिहास लेखनदृष्टी. International Journal of Advance and Applied Research, 13(2), 284 – 295. https://doi.org/10.5281/zenodo.23936651

International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.141 | *Website:* https://ijaar.co.in/
Volume-13, Issue-2 | November - December 2025

चरित्र ही दुसर्या व्यक्तीने लिहिलेली एका विशिष्ट व्यक्तिची जीवनगाथा असते; तर आत्मचरित्र हे स्वत:च स्वत:ची लिहिलेली जीवनकथा असते. आत्मकथन हे ठराविक काळतुकड्यातील व्यक्तीप्रवासाचे आत्मरेखाटन असते. आत्मकथने ही उमेदीच्या काळात लिहिली गेली असल्याने त्यामधून आयुष्याच्या मध्यापर्यंतचा प्रवास येतो; तर आत्मचरित्र हे आयुष्याच्या उतार वयापर्यंतची जीवनकहाणी असते. चरित्रातून जन्मापासून ते अखेरपर्यंतचा जीवनपट येत असतो. "चरित्र आणि आत्मचरित्र यांत अनेक बाबतीत साम्य असते. इतिहासकथन, गौरवबुध्दी, प्रचार, समर्थन, वास्तवाचे दर्शन जिज्ञासा, विशिष्ट व्यक्तित्वाचा वेध इत्यादी सारखी प्रयोजने दोन्हीकडेही सारखीच असण्याचा संभव मुख्य म्हणजे दोहोंचेही अधिष्ठान वास्तवातील व्यक्ती हेच असते. दोहोंनाही 'चरित्र' या नावानेच संबोधण्यात येते. तथापि प्रकृतित: हे दोन्ही प्रकार एक नाहीत. चरित्रात कोणीतरी कोणाला तरी लेखनविषय बनवतो, तर आत्मचरित्रात लेखकच स्वखुषीने स्व:चा लेखनविषय होतो. चरित्रापेक्षा आत्मचरित्राची लेखनपध्दतीही अधिक स्व-तंत्र असते."२

आत्मकथन हा आत्मचरित्राचाच पोटप्रकार आहे. त्याला दलित जाणीवेचा संदर्भ आहे. चरित्र-आत्मचरित्र-आत्मकथन या तीनही प्रकारातून व्यक्तिचा व्यक्तिविशिष्ट स्वरूपाचा इतिहास प्रकट होतो. या प्रकारांचे स्वरूप अर्धललित असल्याने त्यांना ललित साहित्य मानावे का? असाही प्रश्न मराठीत उपस्थित केला गेला. परंतु हे साहित्य आता ललित म्हणून रूढ झालेले आहे. यात व्यक्तिविशिष्टता असली तरी चरित्रनायक हा कोणत्यातरी समूहाचा घटक असल्याने समुहाच्या सामाजिक-सांस्कृतिक अवकाशातील संदर्भ अशा प्रकारच्या साहित्यकृतीमधून प्रकट होत असतात. दलित आत्मकथने ही तर सामाजिक-सांस्कृतिक संघर्षातील शोषणाच्या जाणीवेतून निर्माण झालेली आहेत. जातवास्तवाचे बहुस्वर-बहुस्तर मराठी आत्मकथनांमधून विशद झाले आहेत. चरित्र-आत्मचरित्रपर साहित्यकृतिचा आशय हा वस्तुनिष्ठ आणि सत्यनिष्ठ असतो वा असावा लागतो. ही साहित्यकृती महत्वाचा सामाजिक दस्तावेज असते. म्हणून त्या त्या काळातील चरित्र-आत्मचरित्रपर वाड्मयाची सर्वांगीण नोंद वाड्मयेतिहासातून घेणे आवश्यक असते.

मराठीत वाड्मयेतिहास लेखनशास्त्र स्वतंत्रपणाने विकसित झालेले दिसत नाही. जे झाले ते आंग्ल प्रभावित व वसाहतवादी दृष्टीकोणातून तयार झालेले आहे. ते अजूनही अर्धविकसित स्वरूपातच आहे. भारतीय समाजात अभिजन आणि बहुजन समूहांचा संघर्ष पूर्वापार चालत आलेला आहे. अभिजन सर्वप्रकारच्या सत्तास्थानी आणि बहुजन या सत्तेच्या शोषणाचे बळी, असा हा संघर्ष आहे. बहुजनांच्या ज्ञान आणि कलानिर्मिती परंपरेला नाकारण्याचा प्रयत्न अभिजन परंपरेने सातत्याने केलेला दिसतो. त्याचा परिणाम आधुनिक मराठी वाड्मयाच्या इतिहास लेखनावरही झालेला आहे. त्यातून चरित्र-आत्मचरित्र-आत्मकथन हे वाड्मयप्रकारही वगळता येणार नाही. हा इतिहास वर्ण-वर्ग-जात दृष्टीतून मोठ्या प्रमाणात लिहिला

International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.141 | *Website:* https://ijaar.co.in/
Volume-13, Issue-2 | November - December 2025

गेलेला दिसतो. प्रामुख्याने इ.स.१८१८ ते इ.स.१९६० या कालखंडातील वाङ्मयेतिहास लिहिताना ही जाणीव प्रबळ ठरलेली दिसते. नंतरच्या काळातही काही अंशी ही दृष्टी आहेच; परंतु ती सुप्तावस्थेत आहे. याला काही व्यासंगी व साक्षेपी वाङ्मय इतिहास लेखक आणि वाङ्मय इतिहासविषयक ग्रंथ अपवाद ठरवता येतील.

प्रा.अ.ना. देशपांडे, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे आणि कॉन्टीनेन्टल प्रकाशनाने 'प्रदक्षिणा' या शीर्षकाने सिध्द केलेले मराठी वाङ्मयाच्या इतिहासाचे खंड हे मराठीतील आजपावेतो सर्वोत्तम इतिहास लेखनविषयक ग्रंथ मानले जातात. या ग्रंथांतील चरित्र-आत्मचरित्रपर वाङ्मयाच्या इतिहास लेखनात अभिजनवादी लेखनदृष्टीचा प्रत्यय येतो. यात विष्णुशास्त्री चिपळुणकर परंपरेला ठळक करत फुले परंपरेला झाकण्याचा प्रयत्न दिसतो. प्रा.अ.म.जोशी यांचा 'चरित्र-आत्मचरित्र' हा ग्रंथ आणि 'मराठीतील आत्मचरित्रपर लेखन' हा उषा हस्तक यांचा ग्रंथ या प्रकारच्या विषयावरील महत्वाचे ग्रंथ म्हणून ओळखले जातात. जोशी यांची लेखनदृष्टी अभिजनवादी दिसून येते. हस्तक यांची भूमिका सर्वसमावेशकतेची असली तरी त्यातूनही काही महत्वाचे दुवे सुटलेले दिसतात. काही चर्चासत्राच्या निमित्ताने सिध्द झालेले ग्रंथ आणि गौरवग्रंथाच्या रूपानेही संक्षिप्त इतिहास ग्रंथित झालेला आहे. जून-जुलै २०१३ ला प्रसिध्द झालेला ललित मासिकाचा चरित्रे-आत्मचरित्रे हा विशेषांकही यासंदर्भात उल्लेखनीय आहे. पण त्यातूनही सर्वांगीण इतिहास समोर आलेला नाही. याच ग्रंथांच्या अधारे या निबंधात काही ठळक उदाहरणांच्या अधारे मराठीतील चरित्र-आत्मचरित्रपर वाङ्मयेतिहास लेखनदृष्टीचा शोध घेतलेला आहे. या शोधातून अभिजन परंपरेला कशाप्रकारे प्रोजेक्ट केले गेले आणि बहुजन लेखनव्यवहार कसा दुर्लक्षिला गेला याचे निवडक उदाहरणांव्दारे विश्लेषण केले आहे. ॥२॥

वाङ्मयेतिहासात बहुजन चरित्रांचा उल्लेखच करायचा नाही, आणि केला तरी त्याचे सामर्थ्य, वाङ्मयीन व सामाजिक महत्त्व विशद करायचे नाही अशा प्रकारचा दृष्टीकोन मराठीत दिसतो. म.जोतीराव फुले हे आधुनिक भारताचे शिल्पकार आणि पर्यायी संस्कृतीचा कृतिकार्यक्रम देणारे, शोषणमुक्त समाजरचनेचे स्वप्न पाहणारे दृष्टे विचारवंत आहेत. कृती व लेखनातून परंपरेची पुनर्मांडणी करणारे समाजसुधारक आणि लेखक आहेत. त्यांनी सामाजिक समतेचा आग्रह धरत आणि वंचितांच्या न्यायाची भूमिका घेत लोकशाही व्यवस्थेचा पाया घातला. शेती, शिक्षण, उद्योग, अर्थ, धर्म, जात, इतिहास, स्त्री प्रश्न आदीसंबंधाने त्यांनी केलेले कार्य आणि व्यक्त केलेले विचार हे आधुनिक भारताच्या घडणीला दिशा देणारे आहे. समकालीन वास्तव आणि इतिहासाची चिकित्सा करत त्यांनी लिहिलेले साहित्य हे आधुनिक मूल्यविचार प्रकट करणारे मूलभूत सृजन आहे. असे असताना आधुनिक मराठी वाङ्मयाच्या इतिहासात लेखक-कवी-नाटककार म्हणून त्यांची नोंदच घेतली जात नाही. उशीराने महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या चौथ्या खंडाला त्यांच्या कार्यासंबंधी पुरवणी लेख जोडला जातो. ही

International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.141 | *Website:* https://ijaar.co.in/
Volume-13, Issue-2 | November - December 2025

बाब वाङ्मयेतिहासकारांच्या वर्ण-जात दृष्टीचा प्रत्यय देणारी आणि बहुजनांच्या लेखन परंपरेला हेतुपुर्वक दाबण्याचा प्रयत्न करणारी आहे. त्यांच्यावरील महत्वाच्या चरित्रांचा तर अजूनही इतिहासात साधा उल्लेखही नाही. इ.स.१८९१ साली फुले मृत्युनंतर लगतच्या काळात प्रसिध्द झालेले 'रा.रा.जोतीराव गोविंदरराव फुले' हे यशवंत जोतीराव फुले यांनी लिहिलेले 'सार्वजनिक सत्यधर्म पुस्तका'च्या पहिल्या आवृत्तीतील छोटेखानी आद्यचरित्र आहे. त्याची नोंद इतिहासाने अजूनही घेतलेली नाही. याच वर्षी प्रसिध्द झालेल्या नारो बाबाजी महाधट पाटील यांच्या 'महात्मा जोतिबा फुले यांचे अमरजीवन'या चरित्र पुस्तिकेचा वाङ्मयाच्या इतिहासात निर्देश झाला असता तर म.फुले यांची खरी जन्मतारीख शोधायला त्यांच्या मृत्युनंतर शंभर वर्ष लागले नसते. इ.स.१९२७ ला पंढरीनाथ सीताराम पाटील यांनी 'महात्मा जोतीराव फुले यांचे चरित्र'या शीर्षकाचे पहिले दीर्घ व अभ्यासपूर्ण चरित्र लिहिले. त्याचीही इतिहासाने पुरेशी दखल घेतलेली दिसत नाही. हा अभिजन इतिहास लेखनदृष्टीचा दृष्टीकोन आहे.

म. फुलेंसोबतच सावित्रीबाई फुले यांचे कर्तृत्वही मोठे आहे. भारतीय स्त्रिमुक्तीचा मूलस्रोत म्हणून त्यांच्या कार्याकडे पाहिले जाते. त्यांचे वैश्विक मानवतावादी तत्त्वज्ञान आणि कार्य अखिल भारतीयांना प्रेरक ठरणारे आहे. आजवर त्यांच्यावर मराठीत छोटीमोठी पन्नासच्या आसपास पुस्तके प्रसिध्द झालेली आहेत. त्यात कु.शांताबाई रघुनाथ बनकर यांची 'सावित्रीबाई जोतीराव फुले यांचे अल्पचरित्र'(१९३९) ही पुस्तिका आणि 'क्रांतिदेवता साध्वी सावित्रीबाई फुले'(१९६६) हे सौ.फुलवंताबाई झोडगे यांचे चरित्र महत्वपूर्ण मानले जाते. यांनाही इतिहासात स्थान मिळालेले दिसत नाही. याच चरित्रांचा आधार घेत डॉ. मा.गो.माळी यांनी 'क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले'(१९८०) हे विस्तारित चरित्र लिहिले. याची नोंद घेतली गेली; परंतु त्याचे महत्त्व आणि उपयोगिता लक्षात न घेता कमी करण्याचा प्रयत्न झाला. याविषयी जयंत वष्ट यांचेच पुढील विधान लक्षात घेता येईल. ते लिहितात, "मराठी चरित्र लेखनक्षेत्रातील तोतयेगिरी व बनावटगिरी चा प्रयोग 'क्रांतिज्योती सावित्रीबाई ज्योतीराव फुले'ह्या चरित्रातून डॉ. मा.गो.माळी ह्यांनी केल्याचे पाहण्यात आले. ते आपल्या विधानांना तळटीपा व पुराव्यांचा भरभक्कम आधार देत असल्याचे भासवीत संशोधन पध्दतीच्या आवरणाखाली स्वीकारलेली डॉ. माळी ह्यांची ही लेखनप्रवृत्ती मराठी चरित्रलेखनात अनिष्टच म्हणावयास हवी."३ अत्यंत सुमार अभिजन चरित्रकारांबद्दल पानेचे पाने लिहिणारे वष्ट या चरित्राबद्दल एकही चांगली ओळ लिहून त्याचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेत नाही, ही बाब त्यांच्या इतिहासदृष्टीचा प्रत्यय देणारी आहे. बहुजन चरित्रकारांकडे बघण्याची ही दृष्टी पक्षपाती आहे. सत्यशोधक कृष्णराव भालेकर यांच्या'अंत:काळचे उदगार'या आत्मचरित्रासह इतरही काही सत्यशोधक आणि ब्राम्हणेतर चळवळीतील कार्यकर्त्यांच्या चरित्र-आत्मचरित्रांची नोंद मराठी वाङ्मयेतिहासाने घेतलेली नाही.ती घेतल्यशिवाय या इतिहासाला पूर्णत्त्व येणार नाही.

International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.141 | *Website:* https://ijaar.co.in/
Volume-13, Issue-2 | November - December 2025

अभिजन चरित्रलेखकाला वाङ्मयेतिहासात परंपरा घडविणारे, नवे पर्व निर्माण करणारे, प्रवाह निर्मिणारे, नंतरच्या लेखकांना प्रेरणा देणारे लेखक म्हणून इतिहासबध्द करायचे, कालखंडही त्यांच्या नावाने कल्पायचे आणि बहुजन चरित्रकारांकडे मात्र जाणीवपूर्वक दुर्लक्ष करायचे ही प्रवृत्तीही या इतिहासात दिसते. कृष्णराव अर्जुन केळुसकर हे महत्वाचे चरित्रलेखक आहेत. त्यांची भाषांतरकार व टीकाकार म्हणूनही ओळख आहे. शेतकरी, कामगार, दलित, मागास वर्गाच्या विकासासाठी काम करणार्या संस्थांच्या चळवळी आणि सत्यशोधक समाजात त्यांचा सहभाग होता. बहुजनांच्या उन्नतीसाठी त्यांनी व्याख्यानांच्या माध्यमातून समाजप्रबोधनही केले. पण या कार्यापेक्षा त्यांनी आपली नाममुद्रा ही संशोधनपूर्ण चरित्र लिहून उमटवलेली आहे. 'तुकारामबुवांचे चरित्र'(१८९६), 'गौतमबुध्दांचे चरित्र'(१८९८), आणि 'क्षत्रियकुलावतंस छत्रपति शिवाजी महाराज यांचें चरित्र' (१९०७) ही तीन चरित्रे लिहून त्यांनी चरित्र लेखन आविष्कारपध्दतीच्या नव्या शक्यता निर्माण केल्या. या तीनही चरित्र नायकांवरील ही पहिली विस्तृत, अभ्यासपूर्ण, संशोधनगर्भ आणि समग्र चरित्रे आहेत. व्यक्तिरेखाटनातले प्रभावीपण आणि भाषिक सुबोधता यामुळे ही चरित्रे वाङ्मयीनदृष्ट्या सरस ठरलेली आहेत. 'म.गौतमबुध्द' व 'छ.शिवाजी महाराज' यांच्यावरील चरित्रलेखनासाठी त्यांना दक्षिणा प्रैज कमिटीचे बक्षिसही मिळालेले आहे. त्यांचे शिवचरित्र इंग्रजी, हिंदी व गुजराथी भाषेत भाषांतरीत झालेले आहे. त्या काळाच्या तुलनेत चरित्राच्या आकृतिबंधाचे प्रगल्भ भान त्यांच्या लेखनात दिसते. तरीही मराठी वाङ्मयाच्या इतिहासात 'बुध्द' व 'तुकोबा' चरित्राचा निर्देशही केला जात नाही.

'शिवचरित्रा'ची नोंद येते; परंतु तीही त्रोटक स्वरूपात प्रा.अ.म.जोशी प्रदक्षिणाच्या पहिल्या खंडात साधा नामोल्लेखही करत नाही. त्यांच्या स्वत:च्या ग्रंथातही ओझरता निर्देश करत लिहितात, "केळुसकर यांचा ग्रंथ विशेष उल्लेखनीय आहे. केळुसकर यांनी हा ग्रंथ अत्यंत परिश्रमपुर्वक लिहिलेला असून शिवछत्रपतिविषयक वाङ्मयात या ग्रंथाच्या योगाने मोठी भर पडली आहे, यात शंका नाही."४ जोशी यांच्या मताप्रमाणे हा ग्रंथ फक्त विशेष उल्लेखनीय आणि शिवचरित्रविषक वाङ्मयात भर टाकणारा आहे. त्याचे वाङ्मयीन कसोट्यावर मूल्यमापन करत त्याची योग्यता ठरवण्याचे कष्ट ते घेत नाहीत. दुसरी एक नोंद 'मसाप'च्या खंडात सापडते. ती अशी, "केळुसकर यांनी इंग्रजी व फारसी इतिहासकार, तसेच शिवाजीमहाराजांच्या चरित्रांसंबंधीच्या बखरी इत्यादी त्या काळी उपलब्ध असलेल्या साधनांचा उपयोग करून हा ग्रंथ परिश्रमपुर्वक सजविला आहे. अर्थात मुख्यत: शिवाजीमहाराजांबद्दल वाटणार्या भक्तिभावानेच हे चरित्र लिहिले गेले असल्यामुळे त्यास शिवमहिन्मस्तोत्राचे स्वरूप येणे स्वाभाविक होते. तथापि त्या काळी तरी महाराजांचे एवढे विस्तृत असे हे एकच चरित्र होते."५ या नोंदीतून केळुसकरांनी परिश्रमपुर्वक ग्रंथ सजविल्याचे मान्य केले आहे. पण ते भक्तिभावातून लिहिले गेल्याचे नमुद करून त्याचे महत्त्वही कमी केले आहे. उपरोक्त दोन्ही नोंदी अत्यंत

International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.141 | *Website:* https://ijaar.co.in/
Volume-13, Issue-2 | November - December 2025

संक्षिप्त व त्यांच्या चरित्र लेखनाचे स्थान फक्त उल्लेखापुरतेच असल्याचे अधोरेखन करणार्या आहेत.

विष्णुशास्त्री चिपळूणकर, ल.कृ.चिपळूणकर, ल.रा. पांगारकर, न.चि.केळकर, न.र.फाटक, गं.दे.खानोलकर, द.न.गोखले, धनंजय कीर आदी चरित्रकारांच्या चरित्रलेखनाबद्दल सर्वच वाङ्मयेतिहासात विस्ताराने लिहिले गेले. परंतु त्या तुलनेत केळुसकरांच्या चरित्रलेखनाबद्दल लिहिले जात नाही. त्यांच्या लेखनाचे मूलगामित्त्व, त्यांनी आजमावलेल्या चरित्रलेखनाच्या शक्यता आणि चरित्रलेखनातील वाङ्मयीन सामर्थ्य याचे समदृष्टीने विश्लेषण करून त्यांचे इतिहासातील स्थान निश्चित केले जात नाही. ही इतिहासलेखनातील अभिजनदृष्टी आहे.॥३॥

आत्मचरित्र हे फक्त व्यक्तिगाथेचे वा यशोगाथेचे रेखाटन नसते; तर तो एक महत्वाचा सामाजिक दस्तऐवज असतो. त्या दस्तऐवजातून सामाजिक इतिहासातील अनेक गूढ प्रश्नांची उकल होत असते. म्हणून "सामाजिक इतिहासाच्या दृष्टीने या आत्मचरित्रांचे साधनमूल्य अधिक आहे. कोणत्याही आत्मचरित्राला वास्तवाचं अधिष्ठान असतं. त्यामुळे त्यात वर्णिलेली परिस्थिती, घटितं यांविषयी विश्वासार्हता असते. पूर्वीपासून चालत आलेल्या ऐतिहासिक साधनांमध्ये जेव्हा साहित्याचा अंतर्भाव नव्हता तेव्हा इतिहासातील अनेक घटितांवर सामान्य व्यक्तीच्या किंवा समाजाच्या दृष्टीकोनातून कोणताच प्रकाश पडत नसे. साहित्य हे पूर्वग्रहयुक्त असते असे मानले गेल्याने ही साधने दुर्लक्षिली गेली होती. परंतु आता ही महत्त्वाची, प्राथमिक साधने मानली जातात."६ यामुळे बहुजन परंपरेतील आत्मचरित्रांचे साधनमूल्य लक्षात घेणे आवश्यक आहे. ही बाब आधुनिक वाङ्मयाचा इतिहास लिहिताना लक्षात घेतलेली दिसत नाही. या इतिहासात बहुजनांच्या आत्मचरित्रांचा जो व्यक्तीइतिहासात्मक दृष्टीकोनातून संक्षिप्त आढावा घेतलेला आहे किंवा काहिंचा फक्त निर्देश केलेला आहे, त्यात सामाजिकतेचे मूल्ये दुर्लक्षिलेले आहे. यानिमित्ताने अशा काही आत्मचरित्रांचा निर्देश करणे आवश्यक ठरेल.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे 'माझ्या आठवणी व अनुभव'(१९५८) हे आत्मचरित्र प्रसिध्द आहे. महर्षी शिंदे हे बहुजन समाजसुधारणेच्या चळवळीतील महत्त्वाचे समाजसुधारक असल्याने या आत्मचरित्राला सामाजिक महत्त्व आहे. त्यांच्या समाजकारण, राजकारण आणि लेखनाच्या केंद्रस्थानी येथील अस्पृश्य, श्रमिक आणि शोषित वर्ग राहिलेला आहे. त्यात सामाजिक न्यायाची भूमिका अंतर्भूत आहे. सामाजिक चळवळीतील त्यांच्या कृतिशील सहभागामुळे समाजसुधारणेला गती प्राप्त झालेली आहे. सामाजिक कार्याचे पडसाद त्यांच्या आत्मचरित्रातून उमटलेले आहेत. त्यामुळे समाजसुधारणा चळवळीच्या इतिहासाचे साधन म्हणून या लेखनाकडे पाहता येईल. विठ्ठल दत्तात्रय घाटे हे प्रसिध्द शिक्षणतज्ञ आणि कवी म्हणून ओळखले जातात. त्यांचे 'दिवस असे होते'(१९६१) हे काव्यमयशैलीतील आत्मचरित्र मराठीतील उत्तम आत्मचरित्रांपैकी एक आहे. शिक्षण व साहित्य

International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.141 | *Website:* https://ijaar.co.in/
Volume-13, Issue-2 | November - December 2025

क्षेत्रातील अनुभवसंदर्भाने अनेकविध पैलू यातून उजागर झाले आहेत. शिवाय बालपणीच्या हकिकतीतून आलेल्या ग्रामावकाशाचे तत्कालीन चित्र व त्या त्या गावाची समाजसंस्कृती यातून ध्वनित झाली आहे. सांस्कृतिक स्थित्यंतराच्या दृष्टीकोनातून या साहित्यकृतिचे वाचन करणे शक्य आहे.

'कृष्णकाठ'(१९८४) हे यशवंतराव चव्हाण यांचे आत्मचरित्रही मोलाचे आहे. 'स्व'ला केंद्रस्थानी ठेवत समकालीन महाराष्ट्राचा सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय व चळवळींचा अवकाशपट यातून साकारला आहे. त्यांची आत्मचरित्र लेखनाची दृष्टीही सामाजिक दिसते. ते लिहितात, "राजकीय-सामाजिक कार्यक्षेत्रातील-किंबहुना सार्वजनिक जीवनात भाग घेणार्या व्यक्तिने आत्मचरित्र लिहिणे आवश्यक आहे; हे तिचे एक कर्तव्य आहे, असे मला वाटते. कारण त्यामुळे ऐतिहासिक महत्वाच्या घटनांचे धागेदोरे उलगडणे सुलभ होईल."७ याच दृष्टीने यशवंतराव चव्हाण यांच्या आत्मचरित्राचे मूल्यमापन करणे आवश्यक आहे. ते महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री असल्याने या लेखनाला ऐतिहासिक महत्व आहे. शेतकीज्ज्ञ पांडुरंग चिमणाजी पाटील यांचे 'माझ्या आठवणी'(१९६४) हे आत्मचरित्रही महत्त्वाचे आहे. त्याचाही यादृष्टीने अभ्यास व्हावा.

साठनंतर मराठी वाङ्मयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रेरित चळवळीच्या रेट्यातून दलित साहित्याचा प्रवाह प्रारंभित झाला. या प्रवाहांतर्गत निर्माण झालेल्या दलित आत्मकथनांचा भारतीय पातळीवरील साहित्यावर प्रभाव पडला. मराठीतील आत्मकथनांपासून प्रेरणा घेऊन हिंदी साहित्यातही आत्मकथनांच्या निर्मितीला सुरूवात झाली. या आत्मकथनांमधून सामाजिक-सांस्कृतिक स्तरभेदाचे आणि वेदना-दु:खाच्या अपरिचित अनुभवाचे दर्शन मराठी साहित्याला घडले. भारतीय समाजातील बहिष्कृत भारताचे वास्तव समोर आले. या आत्मकथनांनी महाराष्ट्रातील विविध शोषित समूहजातींच्या बहुसांस्कृतिक व प्रदेशविशिष्ट जीवनव्यवस्थेला मराठी साहित्यात आणले. ही आत्मकथने आशय आणि भाषिकदृष्ट्या महत्वाची ठरली. ही मराठी साहित्यातली मोठीच उपलब्धी आहे. त्यामुळे मराठी आत्मचरित्रपर वाङ्मय परंपरा समृध्द झाली. असे असताना मात्र या आत्मकथनांची वाङ्मयेतिहासकारांनी साकल्याने व तटस्थवृत्तीने नोंद घेतलेली दिसत नाही. जी घेतली त्यातही स्वच्छ दृष्टी दिसत नाही. या संदर्भात स्वातंत्र्योत्तर आत्मचरित्राचा आढावा घेताना जयंत वष्ट यांनी मांडलेले पुढील निरिक्षण याची साक्ष देते. ते म्हणतात, "गेल्या वीस-पंचवीस वर्षात दलित आत्मचरित्रे बर्याच संख्येने प्रकाशित होऊ लागली आहेत. या दलित आत्मचरित्रांचा 'साहित्य' दृष्ट्या विचार करता जरी त्यांची दु:खे, त्यांचे इतरांकडून केले जाणारे शोषण समाजासमोर येत असले तरी, त्यांच्या मर्यादाही स्पष्टपणे जाणवतात. चळवळीतील भूमिका येथे आत्मचरित्रांत उतरत असल्याने जातीयतेच्या संकुचिततेची प्रबळ जाणीव येथेही दिसते. केवळ स्व:तचे दु:ख व भोगलेल्या यातनांची नोंद सातत्याने सर्वत्र केली गेल्याने अनुभव साचेबंद होतात. 'साहित्यकृती'स आवश्यक सूर तेथे जुळत नाही."८

International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.141 | *Website:* https://ijaar.co.in/
Volume-13, Issue-2 | November - December 2025

सरसकट सर्वच दलित आत्मकथनांचे अशाप्रकारे मूल्यमापन करणारी ही दृष्टी जातीय आकसातून आलेली दिसते. जातीय संकुचितता ही दलित आत्मकथनांमधे नाही तर इतिहासकारामध्ये दिसते. कारण येथे कुणाचे सूर कुणाशी जुळत नाही हे लक्षात येते.

शेतीभोवती आकारलेल्या कृषी संस्कृतीची अभिजन परंपरेने सातत्याने हेटाळणी आणि उपेक्षा केली आहे. परिणामस्वरूपी या व्यवस्थेतील सर्व प्रकारची निर्मिती स्वातंत्र्यापर्यंत दुर्लक्षिली गेली. मुळातच मराठीत ग्रामीण जीवनावर अधारित चरित्र-आत्मचरित्रपर वाड्मयाची संख्या अत्यल्प आहे. ज्या राजकीय-सामाजिक क्षेत्रातील नायकांच्या चरित्र-आत्मचरित्रपर साहित्यकृतीतून ग्राम आशय आला तो बालपण आणि गतस्मृतीच्या स्वरूपाचा आहे. असे असले तरी काही अस्सल ग्रामदर्शन घडवणार्या महत्वाच्या साहित्यकृती मराठीत दिसतात. त्या गुणात्मकदृष्ट्या उत्तम असूनही त्यांचा सखोल निर्देश मराठी वाड्मयाच्या इतिहासात दिसत नाही. गोपाळ मोरे या शेतकर्याच्या संघर्षाची यशस्वी व प्रेरणादायी कहाणी अभिमन्यु सूर्यवंशी लिखित 'कुण्या एकाची धरण गाथा'या चरित्रकथेतून साकारते. दुष्काळदाह व धरणग्रस्ताचे वास्तव यातून अधोरेखित होते. विधवा आईने काबाडकष्ट करून दोन मुलाचे केलेले संगोपन आणि त्याला जोडून येणार्या ग्रामीण जगाचा नकाशा चित्रांकित करणारे रा.ना.झोळ यांचे 'रामप्रहर' (१९८४-८५) व हमाली करणार्या आप्पा कोरपे यांच्या ग्रामानुभूतीचे लोककथात्मक बाजातून दर्शन घडवणारे 'मी तो हमाल' (१९९२) ही आत्मचरित्रे दखलपात्र आहेत. ग्रामीण बोलीभाषेत जन्मापासून ते सत्तावीस वर्षाचा जीवनपट मांडणारे व.भा.बोधे यांचे 'कोकरउड्या'(१९८४), व ऊसतोड कामगार ते प्राध्यापक असा संघर्ष रेखाटणारे डॉ. सुभाष शेकडे यांचे 'हाणला कोयता झालो मास्तर' या अत्मकथनांची चिकित्सा आणि इतिहासात नोंद होणे आवश्यक आहे.॥४॥

कोणत्याही वाड्मयप्रकाराचा इतिहास हा तटस्थ, साहित्याच्या कसोट्यावर अधारित आणि साहित्यकृतिचे समतोल मूल्यमापन करून तिची वाड्मयीन योग्यता निश्चित करणारा असला पाहिजे. शिवाय त्यातून वाड्मयाचा एकसंध विकासही अधोरेखित होणे अपेक्षित असते. यात एकांगीपणा-एकसूरीपणा असेल तर तो इतिहास विश्वसार्ह व सार्वमत ठरत नाही. आधुनिक मराठी वाड्मयाचा व्यक्तिनिष्ठ इतिहास लिहिताना प्रा.अ.ना.देशपांडे यांची लेखनशैली ही विसंगतीयुक्त दिसते. त्यांच्या इतिहास लेखनातून मराठी वाड्मयाच्या विकासाची सूत्रे नेमकेपणाने स्पष्ट होत नाही. त्यांनी चरित्र वाड्मयाचा इतिहास लिहिताना चरित्रलेखकाचा अतिशयोक्त गौरव व विभूतीपूजा ही दृष्टी स्वीकारलेली दिसते. कालखंडाची व्यक्तीनुसारी विभागणी करत व्यक्ती प्रभावीत काळ संकल्पनेचा केलेला पुरस्कार अनैतिहासिक आहे. परस्पर विसंगत निरिक्षणे हाही त्यांच्या चरित्र वाड्मयेतिहास लेखनाचा गुणधर्म म्हणता येईल. याविषयी गो.म.कुलकर्णी लिहितात, "प्रा.देशपांडे यांची विवेचनपध्दतीही काही वेळा गोंधळात टाकते. एकीकडे अव्वल इंग्रजीतील चरित्रकारांनी परकीय चरित्रविषय निवडले म्हणून

International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.141 | *Website:* https://ijaar.co.in/
Volume-13, Issue-2 | November - December 2025

त्यांना ते स्वाभिमानशून्य म्हणतात; तर पृष्ठ ५११ वर देशांतरींच्या वीरांची चरित्रे लिहून आमच्या चरित्रलेखकांनी वाखाणण्यासारखी कामगिरी केली म्हणून ते काहींची पाठही थोपतात.”९ अशी अनेक अतार्किक विधाने या ग्रंथात आढळून येतात. या ग्रंथासोबतच इतरही काही वाङ्मयेतिहासविषयक ग्रंथात अशाप्रकारच्या विश्लेषण विसंगती अढळतात.

चरित्र-आत्मचरित्रपर इतिहास लेखनाची भाषा ही साधनरूप असली पाहिजे. माहितीची वाहक म्हणूनच ती यायला हवी. शास्त्रीय साहित्य लेखन भाषेची शिस्त तीमधे असायला पाहिजे. लालित्यमयता तीत असू नये. इतिहासकाराची वैचारिक भूमिका वा विचारधाराही या भाषेतून डोकावू नये. भाषिक सम्यकतेचा दृष्टीकोन इतिहासकाराने बाळगायला हवा. मूल्यमापनात विशिष्ट साहित्य-साहित्यकृती-साहित्यिका संबंधाने अवास्तव शेरेबाजी आणि अतिरिक्त गुणगौरव करणार्या भाषेचा वापर येऊ नये. हा भाषिक विवेक इतिहासकाराजवळ असला पाहिजे. काही मराठी वाङ्मयेतिहासविषयक ग्रंथभाषेत हा विवेक पाळलेला दिसत नाही. पुढील विधानांच्या अधारे ही बाब स्पष्ट केली आहे. प्रा.अ. ना. देशपांडे लिहितात, “न.चि.केळकरकृत टिळकचरित्र म्हणजे टिळकचरित्राचें कच्चें साहित्य आहे.; त्यातून टिळक चरित्राची सुश्लिष्ट, प्रमाणबध्द व रेखीव मूर्ती आकारास आणणारा कुशल व कलादृष्टीसंपन्न कारागीर अजून उदयास यावयाचा आहे.”१० यात केळकरांच्या चरित्र लेखनाची मर्यादा देशपांडे यांना सांगावयाची आहे. पण भाषेत लालित्य आल्याने ती मर्यादा नेमकेपणाने स्पष्ट होत नाही. गोपाळ गोडसे यांच्या ‘गांधी हत्या आणि मी’ या चरित्राचे विवेचन करताना प्रा.जोशी म्हणतात, “गांधीवधामागील पार्श्वभूमी स्पष्ट करून नथुराम यांची कैफियत मांडणे हा या ग्रंथाचा प्रमुख हेतु दिसतो.”११ येथे इतिहासकाराची हिंदुत्त्ववादी व सनातनी विचारधारा प्रकटते. येथे ‘हत्ये’ ऐवजी ‘वध’ हा शब्द जाणीवपूर्वक योजिली जातो. त्यातून अभिजनी भाषेचाही प्रत्यय येतो. डॉ. मेधा सिधये यांचे स्नेहप्रभा प्रधान यांच्या ‘स्नेहांकिता’ या आत्मचरित्राबद्दलच्या पुढील विधानातील शब्द भाषिक अपुरेपणा व संदिग्धता अधोरेखित करतात. त्यांचे विधान असे, “व्यक्तिगत जीवनातील प्रेमसंबंधावर आधारलेली ही कहाणी व्यक्तीची म्हणूनही समाधान देत नाही आणि वाङ्मयीन पातळीवरही जात नाही.”१२ येथे ‘व्यक्तीची म्हणूनही समाधान देत नाही’ या शेरेबाजीतून अचूक मर्यादाबोध होत नाही. ‘वाङ्मयीन समाधान देत नाही’म्हणजे काय? याचे उत्तर या भाषेतून मिळत नाही.॥५॥

म्हाइंभट लिखित लिळाचरित्रापासून देशी चरित्रलेखनाची आद्य परंपरा मराठीत दिसते. तसेच संताच्या आत्मनिवेदनपर अभंगातूनही हा आकृतीबंध साकारलेला दिसतो. संत नामदेवाचे तीर्थावळीचे अभंग या दृष्टीने महत्वाचे आहेत. निरंजन माधव यांचा संवादरूपी ‘संप्रदाय परिमल’ हा ग्रंथ; तसेच नाना फडणीस आणि गंगाधरशास्त्री पटवर्धन यांची आत्मचरित्रे व बखर आणि पोवाड्याच्या आविष्कारपध्दतीतही ही गुणवैशिष्ट्ये दिसतात. परंतु मराठीत चरित्र-आत्मचरित्रपर वाङ्मयाच्या

International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.141 | *Website:* https://ijaar.co.in/
Volume-13, Issue-2 | November - December 2025

आकृतिबंधाचा उदय हा ब्रिटीश राजवटीच्या प्रारंभानंतर झाला. एकोणाविसाव्या शतकाचा उत्तरार्ध आणि विसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत या वाङ्मयाप्रकाराचा विकास झाला. त्याचा अधिक विस्तार हा १९६० नंतर झाला. विविध सामाजिक क्षेत्रे आणि समाजस्तरातील नायक आणि लेखकांनी हे दालन समृध्द केले आहे. याविषयी डॉ. आनंद घाटुगडे म्हणतात, "मराठीतील आत्मचरित्रांचे दालन तसे अलीकडच्या १०-१५ वर्षात सामान्यतः १९७५ नंतरच्या कालखंडात विशेष समृध्द झाले आहेत. 'दलित आत्मकथनां'च्यामुळे हा वाङ्मयप्रकार विशेष लक्ष्यवेधी व लोकप्रिय ठरला. १९८० नंतरच्या अलीकडच्या दशकात तर जीवनाच्या विविध स्तरांतील व्यक्तींनी मोठ्या प्रमाणात आत्मचरित्रांचे लेखन केले आहे, आणि ही आत्मकथने म्हणा, आत्मचरित्रे म्हणा... तितकीच रंचक, उत्सुकता वाढविणारी, कुतूहलपूर्ती साधणारी, म्हणून रसिकांना समाधान देणारी, रसिकांची जीवनकक्षा, जाणिवेच्या अंगाने अधिक विस्तृत करणारी, त्यांची अनुभवसृष्टी अधिक समृध्द करणारी अशी ठरली आहे."१३ त्यामुळेच वाचकांचा वाचकप्रतिसादही वाढलेला आहे. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील आत्मचरित्रपर वाङ्मयाचा हा विस्तार पुरूष आणि स्त्रीयांच्या लेखनकृतींमुळे झालेला आहे. तसाच तो इतिहासगत आणि वर्तमानातील नायकांच्या संशोधकीय वृत्तीतून लिहिलेल्या चरित्रात्मक वाङ्मयानेही झालेला आहे. गेल्या दीडशे वर्षातील चरित्र-आत्मचरित्रपर वाङ्मयाचा इतिहास हा बहुजनवादी दृष्टीकोनातून चिकित्सकपणे पुनर्लेखन करण्याची आवश्यकता आहे. तसे झाले तर या परंपरेतील अनेक अज्ञात चरित्र-आत्मचरित्रे मराठी वाङ्मयाच्या कक्षेत येत, इतिहासाला नवे वळण मिळेल.

हे पुनर्लेखन करताना आणखी एक बाब लक्षात घेणे गरजेचे आहे. "सर्वसामान्य वाचक, हे मुख्यत्वे, आत्मचरित्रपर लेखनाच्या कसदार स्वरूपाचा फारसा विचार न करता, त्यांना परिचित असणार्या, आवडणार्या व्यक्तींच्या आत्मचरित्रपर लेखनाला अधिक प्रतिसाद देतात. त्यामुळे स्वभाविकपणेच, प्रकाशकांचा कलदेखील प्रसिध्दीच्या झोतात असणार्या व्यक्तींचे आत्मचरित्रपर लेखन प्रसिध्द करण्याकडे राहिलेला आहे. जीवनाच्या ज्या क्षेत्रातील व्यक्तींना प्रसिध्दी सहजपणेच मिळत असते, ती क्षेत्रे म्हणजे चित्रपट, नाटक, रंगभूमी, साहित्य, संगीत, राजकारण, समाजकारण, पत्रकारिता म्हणूनच आत्मचरित्रपर लेखनाच्या दालनातला बहुतांश भाग या क्षेत्रातील व्यक्तींच्या आत्मचरित्रपर लेखनकृतींनी व्यापलेला आहे."१४ चरित्र वाङ्मयाची स्थितीही काहिशी अशीच आहे. त्यामुळे चरित्र-आत्मचरित्रपर वाङ्मयाचे पुनर्लेखन करताना वाङ्मयीन मूल्य लक्षात घेणे आवश्यक आहे. आकृतिबंधाच्या सैध्दांतिक तत्त्वज्ञान परिप्रेक्षात मूल्यमापन करत आणि सामाजिक-सांस्कृतिक फलश्रृतीचा अवकाश विस्तार शोधत आधुनिक मराठी चरित्र-आत्मचरित्रपर वाङ्मयाचा इतिहास लिहिला तर तो अधिक सत्यनिष्ठ ठरेल.॥६॥

International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.141 | *Website:* https://ijaar.co.in/
Volume-13, Issue-2 | November - December 2025

मराठी चरित्र वाङ्मयेतिहासात चरित्रनायक, चरित्रलेखक आणि बहुधा चरित्र इतिहास लेखकही ज्ञातीबांधव असल्याचे लक्षात येते. त्यामुळे या इतिहासात ठरवून एखाद्या विशिष्ट लेखकाला वा साहित्यकृतीला थोरपण देण्याची प्रवृत्ती दिसते. आत्मचरित्र-आत्मकथनांच्या बाबतही असेच म्हणता येईल. अलिकडच्या काळात स्वत:ची आदर्श प्रतिमा स्थापित करण्यासाठी स्वत:च स्वत:ची चरित्रे दुसर्याकडून लिहून घेण्याची प्रवृत्ती वाढीस लागते आहे. याच हेतूतून 'मन में है विश्वास' यासारखी आत्मचरित्रेही लिहिली जात आहेत. असा उद्देश ठेवून लिहिल्या गेलेल्या वा जात असलेल्या साहित्यकृती या 'साहित्यकृती' म्हणून श्रेष्ठता प्राप्त करू शकत नाही. कारण त्यात सत्यकथन व तटस्थवृत्ती नसते. आदर्श वाटणार्या घटनांची निवड आणि वस्तुस्थितीचा विपर्यास करून तिचे केलेले सादरीकरण यामुळे तीमधील वाङ्मयीन मूल्य कमी होते. याचाही विचार वाङ्मयेतिहास लेखन करताना झाला पाहिजे.

मराठी चरित्र-आत्मचरित्रपर वाङ्मयेतिहास हा स्वायत्ततावाद्यांच्या व्यक्तिवादी दृष्टीकोनातून लिहिला गेला आहे. त्यामुळे त्यात रूपवादी सौंदर्य दृष्टीकोन अधिक्याने आलेला आहे.वाङ्मयीन घाटाची वगैरे...स्वरूपाची चर्चा या इतिहासातील मूल्यमापनाच्या केंद्रस्थानी आहे.अभिजनांची स्वांतसुखाय दृष्टी त्यातून प्रकटते. हा इतिहास समष्टीवादी दृष्टीकोनातून लिहिला जाणे गरजेचे आहे. या दृष्टीत जीवन व समाजदर्शन हेच वाङ्मयीन सौंदर्य मानलेले आहे. व्यक्तिमनासह झालेला समूहमनाचा आविष्कार येथे मध्यवर्ती असतो. चरित्र-आत्मचरित्राचा नायक ज्या कालखंडात जगतो, त्या कालखंडातील सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक आदी घटितांचे या 'साहित्यकृती'मधून कशाप्रकारे चित्र उमटले आहे, याचाही शोध या दृष्टीतून घेता येतो. चरित्र-आत्मचरित्रपर वाङ्मय हे मानवी इतिहासाचे महत्वाचे साधन असल्याने ही दृष्टी अधिक प्रभावी ठरणारी आहे.

संदर्भ:

१. नागनाथ कोत्तापल्ले, मराठी साहित्य, समीक्षा आणि वाङ्मयेतिहास, महाराष्ट्र साहित्य पत्रिका, त्रैमासिक, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, अंक:३६४, ऑक्टोबर-डिसेंबर २०१८, पृ.१४.
२. गो.म.कुलकर्णी, वाटा आणि वळणे, नवसाहित्य प्रकाशन, बेळगाव, १९७२, पृ.१४१.
३. जयंत वष्ट, स्वातंत्र्योत्तर चरित्र, प्रका. अनिरूध्द कुलकर्णी, प्रदक्षिणा, खंड दुसरा, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, २००४, पृ.३०१/३०२
४. प्रा.अ.म.जोशी, चरित्र-आत्मचरित्र, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, २००७, पृ.१३६
५. प्रा.रा. श्री. जोग(संपा), मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड पाचवा, भाग दुसरा, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, १९९९, पृ.२१७/२१८

६. जास्वंदी वांबूरकर, आत्मचरित्रे: सामाजिक इतिहासाचे दस्तऐवज, ललित, मासिक, मुंबई, जून-जूलै २०१३, पृ.३७/३८
७. यशवंतराव चव्हाण, रूणानुबंध, प्रेस्टीज पब्लिकेशन्स, पुणे, १९८६, पृ. २१३.
८. जयंत वष्ट, स्वातंत्र्योत्तर आत्मचरित्र, प्रका. अनिरूध्द कुलकर्णी, प्रदक्षिणा, खंड दुसरा, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, २००४, पृ.३०८
९. गो.म.कुलकर्णी/दत्तात्रय पुंडे, वाड्मयेतिहास: सद्यस्थिती आणि अपेक्षा, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९९५, पृ. ६८
१०. अ.ना.देशपांडे, आधुनिक मराठी वाड्मयाचा इतिहास, भाग दुसरा, व्हीनस प्रकाशन, पुणे, १९७९, पृ.५२५
११. प्रा.अ.म.जोशी, चरित्रवाड्मय, प्रका. अनिरूध्द कुलकर्णी, प्रदक्षिणा, खंड पहिला, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, २००२, पृ.३२३
१२. डॉ. मेधा सिधये, आत्मचरित्र १९५०-१९७५, संपा.प्रा.रा.रा.ग.जाधव, मराठी वाड्मयाचा इतिहास, खंड सातवा, भाग चौथा, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे,२०११, पृ.२०७
१३. डॉ. आनंद घाटुगडे, ग्रामीण आत्मचरित्रांचा उदय, संपा. प्रा. चंद्रकुमार नलगे, ग्रामीण वाड्मयाचा इतिहास, सुरेश एजन्सी, पुणे, १९९६, पृ.१५६
१४. उषा हस्तक, मराठीतील आत्मचरित्रपर लेखन, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, २००६, पृ.१४४